# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड

## (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प )

## भारत इंडिया मोबिलिटी एक्स्पो मध्ये महा मेट्रोचा सहभाग



नागपूर : नुकतेच ग्रेटर नोएडा येथे पार पडलेल्या भारत मोबिलिटी ग्लोबल एक्स्पो अंतर्गत अर्बन मोबिलिटी व इन्फ्रास्ट्रकचर शो २०२५ मध्ये महा मेट्रोने सहभाग घेतला. केंद्र सरकारच्या वाणिज्य व उद्योग मंत्रालयाच्या वतीने आयोजित या एक्स्पो मध्ये देश विदेशातील नागरिक, केंद्रीय सचिव अधिकारी तसेच अनेक कंपनीच्या सदस्यांनी महा मेट्रोच्या स्टॉलला भेट दिली. महा मेट्रोने सदर एक्स्पो मध्ये डिझाईन, बिल्ट व ऑपरेट विथ महा मेट्रो या शीर्षकाखाली संपूर्ण स्टॉलची रचना केली

होती.ज्याचा मुख्य उद्देश इतर राज्यातील तसेच देशातील मेट्रो रेल प्रकल्पाचे कार्य करत विविध प्रकारच्या सेवा देण्याचा मानस असा होता.

महा मेट्रोने या एक्स्पो मध्ये नागपूर,पुणे आणि ठाणे येथे महामेट्रोच्या वतीने संचालित प्रकल्पाची माहिती प्रदर्शित केली होती तसेच महामेट्रो द्वारे राबविले जाणारे नाविन्यपूर्ण उपक्रम ज्यामध्ये गिनिज वर्ल्ड रेकॉर्ड असा वर्धा मार्गावरील डबल डेकर उड्डाणपूल,६डी बीम प्रणाली आदींची माहिती या ठिकाणी दर्शविण्यात आली होती.  यावेळी महा मेट्रोचे वरिष्ठ अधिकारी ज्यांनी उपस्थितीशी माहिती प्रदान करत संवाद साधला. या एक्स्पो मध्ये महा मेट्रो व्यतिरिक्त दिली मेट्रो, बंगलोर मेट्रो,कोचि मेट्रो,यु पी मेट्रो,नोएडा मेट्रो व्यतिरिक्त अन्य शासकीय कंपनीने देखील यामध्ये सहभाग घेतला होता. देशात अश्या प्रकारचे हे पहिले एक्स्पो ग्रेटर नोएडा येथे आयोजित करण्यात आले होते.

